**MHWS080010272026**

<u>**फौजदारी किरकोळ अर्ज क्र. १०९/२०२६ मधील नि.क्र.०१ वरील आदेश**</u>

०१. अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ५०३ अन्वये जप्त रकमेचा ताबा मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

०२. अर्जदारातर्फे असे कथन करण्यात आले आहे की, यातील अर्जदार याच्या मालकीचे वाहनाचे वर्णन खालील प्रमाणे – Hero motocorp Ltd कंपनीची Pas pro drum self cast हि दुचाकी रजि.क्र. MH–38–S–0848.

०३. वर नमुद वर्णनाचा मुद्देमाल पो.स्टे. रिसोड यांनी गुन्हा रजिस्टर क्र. ५२५/२०२६ कलम १३७–२ बी.एन.एस. अंतर्गत जप्त केलेले आहे. सदर वाहन अर्जदाराच्या मालकीचे आहे. सदर जप्त वाहन हे पोलीस स्टेशन आवारात उघड्यावर पडलेली असून ती चालविण्याच्या स्थितीत राहणार नाही. तसेच नमूद गाडीचे भाग निकामी होतील. सदर गाडीची अर्जदारास व्यापारासाठी नितांत आवश्यकता असल्याने जप्त वाहनाचा ताबा मिळण्यासाठी अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

०४. तपासी अधिकारी यांनी त्यांचे लेखी म्हणणे सादर केले की, Hero motocorp Ltd कंपनीची Pas pro drum self cast हि दुचाकी आरोपीने गुन्हयात वापरलेले वाहन आरोपीकडुन दोन पंचांसमक्ष जप्त करुन मालखाना दाखल केले आहे. जप्त वाहनाचे कागदपत्र सादर करण्याबाबत लेखी समज दिली परंतु वाहनाच्या मालकाने आजपावेतो वाहनाचे कागदपत्र तपासकामी सादर केले नाही. सदरचा गुन्हा महिला संबंधाने गंभीर स्वरुपाचा आहे. वाहनाचे कागदपत्र सादर न केल्याने वाहनाच्या मालकीबाबत निश्चीती होणे बाकी आहे, नमुद वाहन इतर

गुन्हयात वापरले किवा कसे याबाबत तपास होणे बाकी आहे. जप्त वाहनाची विक्री करु शकतो, फेरबदल करु शकतो, सदर वाहन सुपूर्दनाम्यावर दिल्यास गुन्हयातील नमूद आरोपी पुन्हा यासारखे गुन्हा करु शकतात, ते तपासात सहकार्य करणार नाहीत. त्यामुळे सदर वाहन सुपूर्दनाम्यावर देण्यास हरकत आहे असे म्हटले. सहायक सरकारी अभियोक्ता यांनी त्यांचे म्हणणे मांडून सदरचा जप्त वाहन हे गुन्हयाचे कामी पुरावा असल्याने व अर्जदार त्यामध्ये बदल करण्याची शक्यता असल्याने योग्य तो न्यायीक आदेश पारीत करावा अशी विनंती केली.

**०५.** अर्जदाराचे वकील श्री. टी.के.शेख यांचा तसेच अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी वकिल श्री. एम.डी. अडकिने यांचा युक्तीवाद ऐकला.

**०६.** अर्जदाराने सदरचा जप्त सदर वाहन त्याच्या मालकीचे असल्याबाबतचा पुरावा म्हणून नि.क्र. ०३ सोबत अर्जदाराचे आधारकार्डची छायांकित प्रत, जप्त गाडीची आर.सी.ची छायांकित प्रत, इ. कागदपत्रे सदरकामी सादर केलेली आहेत.

**०७.** अभिलेखाचे बारकाईने अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदार हा जप्त वाहनाचा मालक असून अर्जदाराची मालकीबाबत इतर कोणीही हक्क सांगितलेला नाही. सदरचे वाहन हे अर्जदारास परत न दिल्यास साहजिकच ते वापरात नसल्याने वापराविना खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही व त्यामुळे अर्जदाराचे आर्थिक नुकसान होणार आहे. जरी सहा.सरकारी वकिल यांनी जप्त वाहन अर्जदारास परत करण्याबाबत हरकत घेतलेली असली तरी सदर मुद्देमालाच्या मालकीबाबत इतर कोणीही हक्क सांगितलेला नसल्याचे विचारात घेता व त्याबाबत संबंधीत तपासी अधिकारी यांनी आक्षेप नोंदविला असला तरी सदर वाहन वापराविना पडून राहिल्यास निश्चितच ते खराब होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे '**सुंदरलाल अंबालाल देसाई वि. गुजरात राज्य, ए.आय.आर.२००३, मा. सर्वोच्च न्यायालय ६३८**' या प्रकरणातील मार्गदर्शक तत्वांचे अवलोकन केले असता गुन्ह्यातील जप्त वाहनाचा तात्पुरता ताबा अर्जदाराला काही अटी व शर्तीवर देणे उचित होणार आहे.  सबब, मी खालील आदेश देत आहे.

## आदेश

१. अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यात येतो. Hero motocorp Ltd कंपनीची Pas pro drum self cast हि दुचाकी असून जिचा चेसीस क्र. MBLHA10BSGHA21797 व इंजिन क्र.HA10EVGHA23601 अंदाजे ५०,०००/– रुपये मुददेमाल ५०,०००/– रुपये किंमतीचा बॉण्ड देण्याच्या अटीवर अर्जदाराच्या ताब्यात देण्यात यावे.

२. अर्जदाराने सदर जप्त मुददेमाल, पो.स्टे. रिसोड येथील गु.र.नं. क्र. ५२५/२०२६ या खटल्याचा अंतिम निकाल लागेपावेतो विक्री अथवा अन्य प्रकारे तबदिली करु नये व त्यामध्ये कोणताही बदल करु नये.

३. सदर मुददेमाल हा शासनाने घालुन दिलेल्या अटी व शर्तीचे पालन करून वापरावे.

४. ज्या–ज्या वेळी न्यायालय आदेश करेल त्या–त्या वेळी अर्जदाराने सदरचे जप्त मुददेमाल न्यायालयात हजर करावे.

५. येणेप्रमाणे तपासी अंमलदार यांना कळविण्यात यावे.

PRATAP VISHNU SAPKAL Digitally signed by PRATAP VISHNU SAPKAL Date: 2026.06.20 16:28:56 +0530

ठिकाणः रिसोड (पी. व्ही. सपकाळ)

दिनांक: २०.०६.२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, रिसोड

**<u>शेरा</u>**

मी शपथेवर सांगतो की, आदेशातील मूळ मजकूर व पी.डी.एफ. मधील मजकूर शब्द—न—शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नांव | : | पी.व्ही.सपकाळ<br>प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, रिसोड |
| लघुलेखकाचे नांव | : | एच. ए. उचाडे. |
| निकाल तारीख | : | २०.०६.२०२६ |
| पिठासीन अधिका—याने आदेशपत्रावर सही केलेचा दिनांक | : | २०.०६.२०२६ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | : | २०.०६.२०२६ |